



सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे •अंक २७७ • रविवार दि.२ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.


## पावसाचा देशभरात कहर; ११ जणांचा बळी

### बद्रीनाथ यात्रा मार्ग भूस्खलनामुळे बंद

नवी दिल्ली:देशभरातील अनेक राज्यांमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसाने हाहाकार माजविला असून केरळ, कर्नाटक, जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंडमध्ये भूस्खलन, पूर आणि रस्ते खचल्याच्या घटनांमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. विविध दुर्घटनांमध्ये आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला असून हजारो नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.

केरळमध्ये मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे आठ जणांचा मृत्यू झाला असून आठ जण बेपत्ता आहेत. १३ जण जखमी झाले आहेत. राज्य सरकारने २०९ मदत शिबिरे उभारून ५ हजार ७९२ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविले आहे. या आपत्तीत २७ घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून १९६ घरांचे नुकसान झाले आहे.कर्नाटकातील शिवमोग्गा जिल्ह्यात रविवारी पहाटे झालेल्या भूस्खलनात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. जम्मू-काश्मीरमधील किश्तवार जिल्ह्यात शनिवारी झालेल्या ढगफुटीनंतर अचानक पूर आला. अनेक घरे व दुकाने बाधित झाली असून दोन वाहने पुराच्या पाण्यात वाहून गेली. रस्त्यांवर माती व दगडांचा मोठा ढिगारा साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून किश्तवार, डोडा आणि रामबन जिल्ह्यातील सर्व शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत.उत्तराखंडमध्येही मुसळधार पावसामुळे भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. उत्तरकाशीतील यमुनोत्री राष्ट्रीय महामार्गावर दरड कोसळली असून चमोली जिल्ह्यातील गौचरजवळ बद्रीनाथ महामार्गाचा सुमारे २० मीटरचा भाग खचला आहे. त्यामुळे या मार्गावर सध्या एकेरी वाहतूक सुरू असून हवामान विभागाने ७ ऑगस्टपर्यंत अतिवृष्टीचा इशारा दिला आहे.दरम्यान, केरळमधील अलाप्पुझा जिल्ह्यातील कुट्टनाड आणि अप्पर कुट्टनाड परिसरात पुराचा धोका वाढला आहे. पंबा आणि अचन्कोविल नद्यांच्या पाण्याची पातळी वाढल्याने अनेक सखल भाग जलमय झाले आहेत. शंभरहून अधिक घरांवर पुराचा परिणाम झाला असून ११ मदत शिबिरांमध्ये ५८० नागरिकांना आश्रय देण्यात आला आहे.जम्मू-काश्मीरमधील बांदीपोरा जिल्ह्यातही संततधार पाऊस सुरू असून नद्या व ओढ्यांच्या पाण्याची पातळी वाढत आहे. पुढील काही दिवसही मुसळधार पावसाचा अंदाज असल्याने प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

## कुपटी नदीवरील पुलावर मृत्यूचा सापळा

### एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी अंत

यवतमाळ:दहेली गावाजवळील कुपटी नदीवरील पुलावरून कार पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी मध्यरात्री घडली. या दुर्घटनेत पत्नी आणि दोन मुलींना गमावलेल्या नंतर कार चालक अविनाश खंडारे झाडाला लटकून आपला जीव वाचवला.

यवतमाळ जिल्ह्यातील दहेली गावाजवळ काल उशिरा रात्री अविनाश खंडारे हे पत्नी माधवी, मुली प्राची व सांची यांच्यासह नातेवाईकांकडून कारने घरी परतत होते. मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास मुसळधार पाऊस सुरू असताना दहेली गावाजवळील कुपटी नदीचा पूल पार करताना पुलावरून वेगाने पाणी वाहत होते. अंधारामुळे पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांची कार पुराच्या पाण्यात अडकली आणि काही क्षणांतच प्रवाहाबरोबर वाहून गेली.कार वाहू लागताच अविनाश यांनी पत्नी व मुलींना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पाण्याच्या प्रचंड लोंढ्यामुळे त्यांची पकड सुटली. पत्नी आणि दोन्ही मुली त्यांच्या डोळ्यांसमोर पुराच्या पाण्यात वाहून गेल्या. या दुर्घटनेत माधवी खंडारे, प्राची खंडारे आणि सांची खंडारे यांचा बुडून मृत्यू झाला.दुसरीकडे, अविनाश खंडारे यांनी चालकाच्या बाजूची काच उघडून कारबाहेर पडण्यात यश मिळवले. जवळील झाडाच्या फांदीचा आधार घेत त्यांनी तब्बल चार तास जीवाची झुंज दिली. दरम्यान, त्यांनी मोबाईलवरून नातेवाईकांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच बचाव पथक आणि स्थानिक प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. बोटीच्या साहाय्याने त्यांची सुखरूप सुटका करण्यात आली.सुटकेनंतर बोलताना अविनाश खंडारे म्हणाले, पप्पा, मला वाचवा... असा मुलींचा आक्रोश अजूनही कानात घुमत आहे. पत्नी आणि मुलींचे हात धरून त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला; पण पाण्याच्या प्रचंड लोंढ्यामुळे हात निसटले. माझ्या डोळ्यांसमोर माझे सर्वस्व वाहून गेले. या पुरात केवळ माझे कुटुंब नाही, तर माझे संपूर्ण आयुष्यच वाहून गेले.या घटनेमुळे दहेली परिसरात शोककळा पसरली असून, मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर पूल आणि नदी-नाल्यांवरील वाहतुकीबाबत अधिक खबरदारी घेण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे




आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आ.बालाजी कल्याणकर यांनी शाल व पुष्पहार घालून त्यांचे अभिष्टचिंतन केले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, उमेश मुंडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## निकृष्ट पुलामुळे शेतकऱ्यांचा जीव मेटाकुटीला; करंजी-भगवती मार्ग ठप्प,आंदोलनाचा इशारा

माहूर/प्रतिनिधी-पीएमजेएवाय योजनेअंतर्गत करंजीभगवती रस्त्यावर सुरू असलेल्या पुलाच्या कामातील हलगर्जीपणा आता शेतकऱ्यांच्या जीवावर उठला आहे. निकृष्ट दर्जाचे व अर्धवट अवस्थेत सोडलेले कामामुळे शेतकऱ्यांच्या शेताकडे जाणारा मुख्य मार्ग पूर्णपणे बंद झाला असून प्रशासन आणि संबंधित गुत्तेदाराच्या निष्क्रियतेविरुद्ध परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

पुलाचे काम अर्धवट सोडल्यामुळे बैलगाड्या, ट्रॅक्टर तसेच शेतीसाठी लागणारे बियाणे, खत व इतर साहित्य शेतात पोहोचवणे अशक्य झाले आहे. पावसाळ्याच्या तोंडावर शेतकऱ्यांना अक्षरशः वेठीस धरण्यात आल्याची भावना व्यक्त होत आहे. या गंभीर प्रकाराची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते पिंटू आशीर्वाद पाटील वायफनीकर यांनी संबंधित गुत्तेदाराची प्रत्यक्ष भेट घेऊन काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. मात्र त्यानंतरही कोणतीही हालचाल न झाल्याने गुत्तेदाराच्या मनमानीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अर्धवट व निकृष्ट कामामुळे नाल्याचा प्रवाहही अडथळला असून संपूर्ण रहदारी ठप्प झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून मानसिक त्रासातही भर पडली आहे. सार्वजनिक निधीतून होणाऱ्या विकासकामांचा हा दर्जा असेल तर जबाबदार अधिकाऱ्यांची देखरेख नेमकी कुठे आहे, असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित गुत्तेदारावर कठोर कारवाई करावी,शासनाच्या निधीचा गैरवापर होऊन अपहार झाला आहे का हे तपासावे,पुलाचे काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करून शेतकऱ्यांसाठी रस्ता त्वरित खुला




करावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा येत्या काही दिवसांत सर्व शेतकरी एकत्र येऊन तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा पिंटू आशीर्वाद पाटील वायफनीकर यांनी दिला आहे







## रेंगाळलेल्या पावसाची बरसात



**यंदाचा मान्सून मराठवाड्यासाठी सुरुवातीला आशेइतकाच चिंतेचाही विषय ठरला. जूनमध्ये समाधानकारक सुरुवात झाल्यानंतर जुलैच्या मध्यापर्यंत मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने अक्षरशः दडी मारली. नांदेड, लातूर, बीड, परभणी, हिंगोली, धाराशिव आणि जालना या भागांतील शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले होते. पेरणी झालेली पिके करपू लागली होती. अनेक ठिकाणी जमिनीतील ओलावा संपल्याने उगवलेली रोपे सुकण्याच्या मार्गावर होती. दुबार पेरणीचे संकट डोळ्यांसमोर उभे ठाकले होते. अशा परिस्थितीत जुलैच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या दमदार पावसाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला. या पावसामुळे दुबार पेरणीचे संभाव्य संकट मोठ्या प्रमाणात टळले आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा आशेचे हास्य उमटले. मराठवाड्याची शेती आजही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसारखी खरीप पिके वेळेवर आणि नियमित पाऊस मिळाल्यासच चांगले उत्पादन देतात. यंदा सुरुवातीच्या पावसानंतर आलेल्या खंडामुळे पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून बियाणे, खते आणि मशागतीवर खर्च केला होता. त्यामुळे पाऊस न आल्यास पुन्हा बियाणे घेऊन दुबार पेरणी करावी लागेल, या भीतीने ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, जुलैच्या अखेरीस निसर्गाने जणू शेतकऱ्यांची हाक ऐकली. सलग आणि चांगल्या स्वरूपाच्या पावसामुळे जमिनीत पुन्हा ओलावा निर्माण झाला. करपलेली पिके सावरू लागली, नद्या-नाले वाहू लागले आणि तलाव, बंधारे तसेच धरणांतील पाणीसाठ्यात वाढ होऊ लागली. या पावसामुळे केवळ उभी पिकेच वाचली नाहीत, तर पिण्याच्या पाण्याच्या आणि जनावरांच्या चाऱ्याच्या चिंतेलाही काहीसा दिलासा मिळाला. तथापि, हा दिलासा कायमस्वरूपी असल्याचे समजणे धोकादायक ठरेल. हवामान बदलाचे परिणाम आता अधिक स्पष्टपणे दिसू लागले आहेत. कधी अतिवृष्टी, कधी दीर्घ खंड, तर कधी अवेळी पाऊस अशा अनिश्चित चक्रामुळे शेतीचे नियोजन अधिक कठीण होत आहे. पावसाचे प्रमाण वर्षभर पुरेसे असले, तरी तो योग्य वेळी आणि समप्रमाणात न पडल्यास शेतकऱ्यांचे नुकसान अटळ ठरते. त्यामुळे केवळ एक-दोन आठवड्यांच्या चांगल्या पावसाने सर्व प्रश्न सुटले, असे मानणे योग्य ठरणार नाही.याच पार्श्वभूमीवर जलसंधारण, शेततळी, सूक्ष्म सिंचन, पाणी साठवण आणि पिकांच्या बदलत्या पद्धती यांना अधिक महत्त्व द्यावे लागेल. शासनाने हवामानाचा अचूक अंदाज शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचविण्याची व्यवस्था अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागाने बदलत्या परिस्थितीनुसार पीक व्यवस्थापनाबाबत सातत्याने मार्गदर्शन करणेही तितकेच गरजेचे आहे.मराठवाड्याचा शेतकरी संकटांशी लढण्याची ताकद ठेवतो; पण प्रत्येक वेळी निसर्गाची परीक्षा देणे त्याच्या हातात नसते. त्यामुळे शेतीला हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी दीर्घकालीन धोरणांची अंमलबजावणी अपरिहार्य आहे. जलसंधारणाच्या कामांना गती, सिंचनक्षमता वाढविणे, पीक विमा अधिक प्रभावी करणे आणि शेतकऱ्यांना तातडीने मदत उपलब्ध करून देणे, ही काळाची गरज आहे. जुलैच्या अखेरीस झालेल्या दमदार पावसाने मराठवाड्याच्या शेतकऱ्यांना नवसंजीवनी दिली आहे. दुबार पेरणीचे संकट टळल्याने दिलासा मिळाला असला, तरी मान्सूनचा उर्वरित कालावधीही तितकाच महत्त्वाचा आहे. निसर्गाने दिलेल्या या संधीचे रूपांतर समृद्धीत करण्यासाठी नियोजन, जलव्यवस्थापन आणि शाश्वत कृषी धोरणांची जोड आवश्यक आहे. पावसाची ही रेंगाळलेली बरसात केवळ शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित करणारी ठरू नये, तर मराठवाड्याच्या कृषी भवितव्याला नवी दिशा देणारी ठरावी, हीच अपेक्षा.**

# मन्याड खोऱ्याच्या जनविश्वासाचा बुलंद आवाज: लोकनेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर



सत्तेची पदे अनेकांना मिळतात, पण जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण करण्याचे भाग्य मोजक्यांनाच लाभते. कारण लोकनेता हा निवडणुकीच्या मतपेटीतून घडत नाही; तो घडतो जनतेच्या अश्रूंना आधार देताना, संघर्षात खंबीरपणे उभा राहताना आणि विकासाची स्वप्ने प्रत्यक्षात उतरविताना. लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे अशाच लोकविश्वासातून घडलेले नेतृत्व आहे.

२ ऑगस्ट हा त्यांचा वाढदिवस. हा केवळ एका लोकप्रतिनिधीचा जन्मदिन नाही, तर जनतेसाठी झिजणाऱ्या, समाजहितासाठी झटणाऱ्या आणि विकासाला आयुष्याचे ध्येय मानणाऱ्या एका कर्मयोग्याचा गौरव करण्याचा दिवस आहे.

गेली चार दशके चिखलीकर कुटुंबाने जनतेशी जपलेले नाते हे राजकारणाच्या पलीकडचे आहे. सत्ता आली म्हणून जनता जवळ नाही आणि सत्ता गेली म्हणून जनता दूर नाही, असे हे विश्वासाचे नाते काळाच्या प्रत्येक कसोटीवर टिकले आहे. या परंपरेचा सक्षम वारसा पुढे नेताना प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लोकप्रतिनिधित्वाला केवळ राजकीय जबाबदारी न मानता सामाजिक बांधिलकीचे स्वरूप दिले. आज लोहा-कंधार मतदारसंघाचा उल्लेख विकासाच्या दृष्टीने होत असेल, तर त्यामागे त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची मोठी ताकद आहे. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे, पूल, पिण्याच्या पाण्याच्या योजना, सिंचन, शिक्षण, आरोग्य सुविधा, धार्मिक स्थळांचा विकास आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा ध्यास मतदारसंघाच्या प्रगतीचा महत्त्वाचा आधार ठरला आहे. अनेक वर्षे रखडलेल्या प्रश्नांना त्यांनी शासनाच्या दालनात सातत्याने आवाज दिला आणि त्यांना मार्गी लावण्यासाठी अथक प्रयत्न केले.

**मारुती जाधव**
स्वीय सहाय्यक,
आ.प्रतापराव पाटील चिखलीकर

मात्र विकासकामांपेक्षाही जनतेला अधिक भावते ती त्यांची माणुसकी. एखाद्या गरीबाच्या घरात संकट कोसळले, शेतकऱ्याला न्यायासाठी संघर्ष करावा लागला, विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदतीची गरज भासली किंवा एखादा रुग्ण उपचारासाठी धडपडत असला, तर मदतीचा हात पुढे करणाऱ्या मोजक्या लोकप्रतिनिधींमध्ये प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यामुळेच त्यांचे कार्यालय हे अनेकांसाठी आशेचे दार बनले आहे.जनतेने त्यांना दिलेली मन्याड खोऱ्याचा वाघ ही उपाधी केवळ राजकीय ताकदीची नाही; ती अन्यायाविरुद्ध उभे राहण्याच्या त्यांच्या निर्भीड स्वभावाची साक्ष आहे. मतदारसंघाच्या प्रश्नांवर शासनाला जाब विचारताना त्यांचा आवाज ठाम असतो, तर जनतेच्या व्यथा ऐकताना त्यांचे मन तितकेच संवेदनशील असते. संघर्षाची धार आणि माणुसकीची ऊब यांचा दुर्मीळ संगम त्यांच्या नेतृत्वात दिसून येतो.

आजच्या राजकारणात जनतेपासून दूर जाणाऱ्या नेतृत्वाची चर्चा होत असताना प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी मात्र जनतेशी असलेली नाळ अधिक घट्ट केली आहे. त्यांच्या दालनात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपुलकीची वागणूक मिळते. राजकीय पक्ष, जात, धर्म किंवा आर्थिक स्थिती न पाहता मदतीसाठी धावून जाण्याची त्यांची वृत्तीच त्यांच्या लोकप्रियतेचा खरा पाया आहे.लोकशाहीत निवडणुका जिंकणे हे यशाचे मोजमाप असू शकते; पण जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणे हीच खरी नेतृत्वाची ओळख असते. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी विकास, विश्वास आणि जनसेवेच्या त्रिसूत्रीवर उभे राहून ही ओळख निर्माण केली आहे. म्हणूनच लोहा-कँधारच्या जनतेसाठी ते केवळ आमदार नाहीत, तर संकटात धावून येणारा आधार, विकासाची खात्री आणि लोकविश्वासाचे प्रतीक आहेत.

२ ऑगस्ट रोजी वाढदिवसानिमित्त जनतेच्या हृदयात अढळ स्थान निर्माण करणारे, विकासाला वेग आणि जनसेवेला दिशा देणारे लोकनेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांच्या कार्याचा हा प्रवास अधिक व्यापक व्हावा, समाजहिताची त्यांची धडपड अधिक जोमाने सुरू राहावी आणि जनतेचा हा विश्वास अधिक दृढ व्हावा, हीच असंख्य नागरिकांची सदिच्छा.

# संघर्षवृत्ती लोकनायक-लोकनेते; आ.प्रतापराव पाटील चिखलीकर

सुसंस्कृत आणि राजकारणातील मातब्बर जिल्हा तसेच मराठवाड्यातील सुसंस्कारित जिल्हा म्हणून नांदेड जिल्ह्याची ओळख आहे. अनेक दिग्गज नेते या जिल्ह्याने समाजकारण, राजकारण, साहित्य आणि समाजसेवा या क्षेत्राला दिलेले आहेत.राजकारण हा समाजसेवा आणि जनसेवा तसेच लोक विकासाचा एक राजमार्ग आहे आणि या राजमार्गातून जनतेचा सर्वांगीण विकास होत असतो. राजकारणाचा प्रदीर्घ इतिहास पाहता नांदेड जिल्ह्यात अनेक नेत्यांनी राजकीय योगदान दिलेले आहे.

एका सोज्वळ वारकरी आणि सुसंस्कारित कृषी प्रधान शेतकरी कुटुंबामध्ये प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा जन्म २ ऑगस्ट रोजी १९६१ रोजी चिखली ता. कँधार या गावी झाला. त्यांचे वडील शांतिदूत गोविंदराव पाटील चिखलीकर हे पंचक्रोशी मध्ये अतिशय सज्जन आणि सुसंस्कारित व्यक्ती म्हणून ओळखले जायचे. त्यांच्या माध्यमातून प्रतापराव पाटील चिखलीकर यांना राजकारण आणि समाजकारणाचे तसेच सुसंस्कारित कृषीप्रधान जनसेवेचे धडे मिळत राहिले.पुढे महाविद्यालयीन शिक्षण आणि नांदेड येथील युवकांचे संघटन यातून ते यशवंत महाविद्यालयात शिक्षण घेत असताना राजकारणात प्रवेशित झाले, असेही म्हणावे लागेल.युवा कार्यकर्ता म्हणून युवक काँग्रेस ते जिल्ह्यातील विविध वैधानिक संस्थांवर त्यांनी कार्य केले. राजकारण आणि समाजकारणात जनता माझी आणि मी जनतेचा हे बेरजेचे राजकारण करीत आमदार चिखलीकर यांनी आजपर्यंत केलेला संघर्ष आणि जिल्ह्यात कोणत्याही नेत्यांनी केली नसतील एवढे पक्षप्रवेश त्यांनी केलेले आहेत हे वास्तव आहे.

आणि त्याहीपेक्षा वास्तव आहे की, या प्रत्येक पक्षप्रवेशानंतर जनतेने त्यांना भरभरून प्रेम दिले आहे.पक्षीय राजकारण, राजकीय परिस्थिती, याहीपेक्षा जनता एखाद्या नेत्याला आपल्या तळहाताच्या फोडाप्रमाणे जपते हे विशेष आहे. आणि त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे जिल्ह्यातील राजकारणातील समांतर सत्ता केंद्र तयार ठेवणारे...सरपंच पदापासून ते देशाच्या सर्वोच्च सभागृह असणाऱ्या संसदेचे सदस्य पद भूषवणारे, नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय नेते तथा लोहा विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रतापराव गोविंदराव पाटील चिखलीकर हे आहेत.ग्रामपंचायतीचे सरपंच, सोसायटीचे चेअरमन, जिल्हा परिषदेचे सदस्य, सभापती, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक या पदांपासून ते आमदार, खासदार या पदांवर सर्वोच्च जनसेवेचा ध्यास मनाशी बाळगून कार्य केलेले हे नेतृत्व.




गावपातळीपासून ते देशपातळीपर्यंत राजकारणातील विविध बारकावे आणि त्यातून जनतेचा होणारा विकास याचा अविरत ध्येयभाव उराशी बालगत दररोज जनसामान्यांच्या समस्या ऐकणे दौरे करणे आणि शासन प्रशासन यातील दुवा बनून राजकीय इच्छाशक्तीने आपला मतदारसंघ आणि आपला जिल्हा याचप्रमाणे ग्रामीण गोरगरीब जनता मायबाप बंधू या सर्वांना सगेसोयरे म्हणून कुठलाही जातीपात भेदभाव न ठेवता समाजकारण आणि राजकारण यांच्या माध्यमातून सतत राजकीय इच्छाशक्ती आणि सामाजिक प्रेरणा जनते प्रती ठेवणारे असे हे लोकनेते. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासून ते देशाच्या राजकारणातील सर्वोच्च असणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांपर्यंत त्यांनी निवडणुका लढवल्या.संघर्ष हा त्यांच्या राजकीय जीवनाचा एक अविभाज्य भाग राहिलेला आहे. स्वर्गीय डॉ.शंकरावजी चव्हाण साहेब यांचे राजकारणातील पट्ट शिष्य म्हणून चिखलीकर साहेबांची राजकीय ओळख आहेच. राजकीय योगायोग म्हणून त्यांनी ज्या ज्या पक्षांमध्ये प्रवेश केला त्या त्या पक्षांमध्ये अंतर्गत राजकारण यापासून ते विभिन्न राहू शकले नाहीत.ज्या पक्षात जातील त्या पक्षाचे अत्यंत निष्ठेने आणि राजकीय प्रबळ इच्छाशक्तीने कार्य करून त्या पक्षाला जिल्ह्यातील समांतर सत्ता केंद्र बनवण्याचे राजकीय कार्य आपल्या संघर्ष वृत्तीने आमदार चिखलीकर यांनी आज पर्यंत केले आहे ते आजही सुरूच आहे.राजकीय शिस्त आणि जनसेवा याबरोबरच वैयक्तिक हितसंबंध जपत जनता आणि नेता यांच्यातील नाते विश्वासावर दृढ ठेवणे आणि राजकीय इच्छाशक्तीवर जनतेचा विकास करणे हे त्यांचे अत्यंत भरीव योगदान आहे.

अनेक मतमतांतरे असूनही जिल्ह्यातील राजकारणात सर्व समावेशित आणि सर्वांना सोबत घेऊन बेरजेचे राजकारण करावे आणि जनतेचा विकास करावा हे त्यांचे उद्दिष्ट महत्त्वपूर्ण आहे.कुठल्याही क्षेत्रातील राजकीय परिस्थितीमध्ये चिखलीकर साहेब ज्या ज्या वेळेस मतदानाच्या प्रक्रियेतून उमेदवार म्हणून मैदानात असतात त्या त्यावेळेस त्यांचा कितीही सोपा वाटत असलेला संघर्ष, ही आजपर्यंत अत्यंत चुरशीचा आणि लढत पूर्ण राहिलेला आहे, हे विशेष आहे.परंतु याही परिस्थितीतून जनतेने त्यांना दिलेली साथ आणि त्यांचे संघर्षमय आणि धडाडीचे राजकीय जीवन, जनता जपत आहे.आणि नांदेड जिल्ह्यातील नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यातील एक वादळी संघर्षशील व्यक्तिमत्व म्हणून जनतेने त्यांना स्वीकारलेले आहे.मागील ४० वर्षांच्या अथक राजकीय परिस्थितीशी लढून त्यांनी राजकारणामध्ये आढळ असे स्थान निर्माण केलेले आहे अशा सर्व संयमी जनता भिमुख लोकप्रिय नेतृत्वास त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विशेष शुभेच्छा..!

**रत्नाकर फुलारी**
(मुख्याध्यापक),रत्नेश्वरी मा.वि.,
वडेपुरी ता.लोहा जि.नांदेड

त्यांची उत्तरोत्तर राजकीय कारकीर्द भरभराटीस जावो ही सदिच्छा..!

## ७८ लाखांच्या कामात पहिल्याच पावसात भेगा



मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यातील जाहूर येथील मालगुजारी तलावाच्या पाळूवर पहिल्याच पावसात मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल ७८ लाख रुपये खर्चून करण्यात आलेल्या या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून कामाची चौकशी करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जाहूर येथील तलावाच्या पाळूचे काम काही दिवसांपूर्वी पूर्ण करण्यात आले. मात्र, पावसाला सुरुवात होताच पाळूवर मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याचे दिसून आले. या पाळूवरून शेतकऱ्यांचा ये-जा करण्याचा प्रमुख मार्ग असून, दररोज अनेक शेतकरी या रस्त्याचा वापर करतात. पाळूवरील भेगा दिवसेंदिवस वाढत असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसाचे प्रमाण वाढल्यास पाळू खचण्याची किंवा रस्ता धोकादायक होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन पाळूची दुरुस्ती करावी, अशी मागणी शेतकरी सुनील पाटील हिवराळे यांनी केली आहे. पाळूची सध्याची स्थिती पाहता भीती वाटत असून, मोठा अपघात होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात. संबंधित विभागाने घटनास्थळी पाहणी करून कामाच्या गुणवत्तेची चौकशी करावी आणि दोषींवर योग्य कारवाई करावी. दरम्यान, ७८ लाख रुपये खर्चून करण्यात आलेल्या कामात पहिल्याच पावसात भेगा पडल्याने कामाच्या दर्जाबाबत नागरिकांकडून शंका उपस्थित केली जात आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पाळूची दुरुस्ती करावी व शेतकऱ्यांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# नवीन शैक्षणिक धोरण-शिक्षणाचा प्रसार

नवीन शैक्षणिक धोरण (एनईपी-२०२०) हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणणारे धोरण आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश सर्वांसाठी दर्जेदार, समावेशक आणि कौशल्याधारित शिक्षण उपलब्ध करून देणे हा आहे. शिक्षण केवळ पाठांतरापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. मातृभाषेतून शिक्षणाला प्राधान्य दिल्यामुळे विद्यार्थ्यांना विषय अधिक चांगल्या प्रकारे समजतात. पूर्वप्राथमिक शिक्षणालाही या धोरणात महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. ५+३+३+४ अशी नवीन शैक्षणिक रचना लागू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिकित्सक विचार, समस्या सोडविण्याची क्षमता आणि संवाद कौशल्ये विकसित करण्यावर भर दिला आहे. डिजिटल शिक्षणाला प्रोत्साहन देऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात आला आहे. व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकासालाही विशेष महत्त्व दिले आहे. शिक्षण सर्वांसाठी सुलभ आणि गुणवत्तापूर्ण व्हावे यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. शिक्षकांचे प्रशिक्षण आणि अध्यापन पद्धती अधिक प्रभावी करण्यावरही भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे विषय निवडण्याचे अधिक स्वातंत्र्य देण्यात आले आहे. परीक्षापद्धतीतही आवश्यक बदल करून आकलनावर आधारित मूल्यमापनाला प्राधान्य दिले आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाचा प्रसार अधिक व्यापक आणि परिणामकारक होण्यास मदत होत आहे. या धोरणामुळे भारतातील शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि रोजगाराभिमुख बनत आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी उपलब्ध करून देणे हे या धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम, जबाबदार आणि आत्मनिर्भर नागरिक घडविण्याचे ध्येय या धोरणाने ठेवले आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरण हे भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.




**- उस्केलवार आबासाहेब**
प्रा.शा.बन्नाळी

सायंदैनिक **नांदेड वार्ता**
* **संपर्क कार्यालय** *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# जबरी चोरीच्या घटनेतील तीन आरोपींना अटक

नांदेड/प्रतिनिधी-जबरी चोरीच्या गुन्ह्यातील तीन आरोपींना विमानतळ पोलीसांनी अटक केली आहे. शुक्रवार दि.३१ जुलै रोजी रात्री तक्रारकर्ते एलआयसी कार्यालयाच्या पाठीमागील रस्त्याने जात असतांना अज्ञात तीन आरोपींनी त्यांची दुचाकी अडविली. तक्रारकर्त्यास दगडाने मारहाण करुन त्याच्या जवळील सॅमसंग कंपनीचा मोबाईल हिसकावून घेतला होता. त्यानंतर काही वेळाने आरोपींनी एका नागरिकाचा मोबाईल मारहाण करुन घेतल्याची घटना घडली होती. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेवून प्रतिक हरीष सोनटक्के (वय २२), राहुल अशोक थोरात (वय २३), प्रशिक देवानंद श्रावणे (वय १९) सर्व रा. राजीव गांधी शाळेच्या मागे बालाजीनगर,नांदेड यांना अटक केली. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्या जवळून चोरी केलेले दोन मोबाईल जप्त करण्यात आले. या गुन्ह्याचा तपास पोलीसांकडून सुरु असून आरोपींकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणासह विविध सामाजिक उपक्रम

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे शेतकरीपुत्र व लोकप्रिय आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार (दि.१ ऑगस्ट) रोजी संपूर्ण मतदारसंघात वृक्षारोपणासह विविध सामाजिक, धार्मिक व जनहिताचे उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. आमदार बोंढारकर यांनी जाहीर केलेल्या ११ हजार वृक्ष लागवडीच्या संकल्पाचा शुभारंभ बोंढार-हवेली येथे वृक्षारोपण करून करण्यात आला. या उपक्रमाला त्यांच्या मातोश्रींचे आशीर्वाद लाभले.

वाढदिवसानिमित्त शहर व ग्रामीण भागात स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप, अन्नदान, फळवाटप, महिला सफाई कर्मचाऱ्यांना साडी वाटप, आरती तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे विविध कार्यक्रम दिवसभर आयोजित करण्यात आले. जुन्या नांदेड भागात शहरप्रमुख तुलजेश यादव यांच्या पुढाकारातून स्वच्छता मोहीम, महिला सफाई कर्मचाऱ्यांना साडी वाटप आणि शालेय साहित्य वाटप करण्यात आले. तालुकाप्रमुख अशोक मोरे यांच्या वतीने सोनखेड येथील शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, सोनबर्डी देवस्थान येथे वृक्षारोपण तसेच सोनखेड ग्रामीण रुग्णालयात फळवाटप करण्यात आले. सिडको येथील नृसिंह विद्यामंदिर येथे साहेबराव मामीलवाड यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. हनुमानगड येथील सुमन बालगृहात राजू पुयड यांच्या पुढाकारातून अन्नदान करण्यात आले. युवासेना जिल्हाप्रमुख बाळू पाटील मोरे यांच्या नेतृत्वाखाली त्रिकुट गणपती मंदिर येथे आरती, अन्नदान व वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. वजिराबाद येथील कर्मवीर साहेबराव बारडकर प्राथमिक शाळेत स्वराज्य यादव यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. सिडको शहरप्रमुख सुहास खराणे पाटील यांच्या नेतृत्वाखाली वसरणी येथे वृक्षलागवड तसेच अंध विद्यालयात अन्नदान करण्यात आले. शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या वतीने सिडको मोढा परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. याशिवाय गोदावरी सेवा समितीच्या वतीने जुना मोंढा भागातील शनी मंदिर येथे गंगा आरती



करण्यात आली. यासर्व मुख्य कार्यक्रमास सौ.सरस्वतीताई आनंदराव पाटील बोंढारकर, शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, शहरप्रमुख तुलजेश यादव, शहरप्रमुख सुहास खराटे पाटील, तालुकाप्रमुख अशोक मोरे, युवासेना जिल्हाप्रमुख बाळू पाटील मोरे, जिल्हासंघटक शंकर पिनोजी, नगरसेविका सौ. नीलमताई तुलजेश यादव, रामराव पाटील तिडके, श्याम पाटील वानखेडे, राज पाटील, गोविंद तिडके, संतोष तिडके, बालाजी पाटील सपुरे, गणेश मोरे, बालाजी पाटील भायेगावकर, कामाजी पाटील, प्रभाकर आढाव, साहेबराव मामीलवाड, व्यंकटेश मामीलवार, ज्ञानोबा मोरे, माऊली महाराज, सुदामराव मोरे, ज्ञानोबा चोपदार, रहमान शेठ, बालाजी बहिरे, वैजनाथ मोरे, अंकुश मोरे, अंकुश शिखरे, रवी थोरात यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रहाटी ग्रा.पं.च्या वतीने सौ.संगीताताई विठ्ठल पाटील डक यांचा सत्कार

नांदेड/प्रतिनिधी-दि.नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीमध्ये मोठे मताधिक्य घेऊन सौ. संगीताताई विठ्ठल पाटील डक यांनी विजय मिळविल्याबद्दल नांदेड तालुक्यातील रहाटी (बु.) ग्रामपंचायत आणि गावकऱ्यांच्या वतीने दि.२ ऑगस्ट रोजी सत्कार करण्यात आला.




दि.नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीमध्ये प्रचंड मते घेऊन नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या नेत्या सौ. संगीता विठ्ठल पाटील डक ह्या प्रचंड मतांनी विजयी झाल्या. त्यांचे अनेक गावात सत्कार केले जात आहे. रहाटी ग्रामपंचायत व गावकऱ्यांच्या वतीने सौ. संगीताताई पाटील डक आणि नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विठ्ठल पाटील डक यांचा शाल-हार आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.व भावी कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी सरपंच पंढरीनाथ बोकारे, उपसरपंच नामदेव खरबे, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष शंकरराव बोकारे, केशवराव बोकारे, सेवा सोसायटीचे चेअरमन पुंडलिकराव बोकारे, शिवाजी बोकारे, भानुदासराव भोकरे, सखाराम बोकारे, बालाजीराव बोकारे, विश्वनाथ बोकारे, व्यंकटराव बोकारे, भीमराव बोकारे, गंगाधर आप्पा थेटे, जगन बोकारे, माजी उपसरपंच नागसेन लांडगे, नागोराव बोकारे, माजी उपसरपंच गजानन बोकारे, रावसाहेब बोकारे, नारायण नितनवरे, दत्ता बोकारे, कामाजी वाटोरे, चेअरमन पंडित शिंदे, लोभाजी हिंगोले, सुधाकर बोकारे, पंढरी बोकारे, पमा बोकारे, सुनील बोकारे, राहुल बोकारे आदिची उपस्थिती होती.

# धर्माबादमध्ये साडेचार लाख रुपयांची घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-धर्माबाद शहरातील गणेशनगर येथे एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी साडेचार लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली आहे.

हणमंत भीमराव जामनोर (वय ५४) रा.गणेशनगर, धर्माबाद हे घराला कुलूप लावून कुटुंबियांसमवेत दि.३१ जुलै रोजी बाहेरगावी गेले होते. अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास जामनोर यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम असा साडेचार लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे. हणमंत जामनोर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्या विरुद्ध धर्माबाद पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनी श्रीमती पगलवाड ह्या करीत आहेत.

# तरुणावर प्राणघातक हल्ला

नांदेड/प्रतिनिधी-क्षुल्लक कारणावरुन तरुणावर प्राणघातक हल्ला करुन जखमी केल्याची घटना महेबुबीया कॉलनी,नांदेड येथे घडली आहे. सलमान जावेद खान या तरुणावर शुक्रवारी रात्री सव्वा दहाच्या सुमारास महेबुबीया कॉलनी येथे तीन जणांनी प्राणघातक हल्ला करुन गंभीर जखमी केले आहे. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चोरट्यांनी हायवा पळविला

नांदेड/प्रतिनिधी-शेतात उभा केलेला हायवा टिप्पर अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना मौजे सायाळ शिवारात घडली आहे.

दत्ता माधव कदम यांनी मौजे सायाळ शिवारात दि.२५ जुलै रोजी हायवा टिप्पर क्र. एमएच २६ बीबी-६८१४ उभा केला होता. अज्ञात चोरट्यांनी सदरील हायवा टिप्पर चोरुन नेला आहे. याप्रकरणी लिंबगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अण्णाभाऊंचा विचार म्हणजे सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा-आ.केराम

किनवट/प्रतिनिधी-लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा क्रांतिकारी वारसा निर्माण केलाय. शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजात स्वाभिमानाची ज्योत पेटविण्याचे महान कार्य त्यांनी केले. महापुरुषांच्या विचारांची विभागणी करणे म्हणजे मानवतेची विभागणी करण्यासारखे असल्याचे प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी केले.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा प्रांगणात १ ऑगस्ट रोजी जयंती सोहळा संपन्न झाला. त्यावेळी आ.केराम बोलत होते. नगराध्यक्षा सौ.सुजाताताई एंड्रलवार अध्यक्षस्थानी होत्या. पुढे बोलताना आ.केराम म्हणाले, अण्णाभाऊ साठे हे विद्रोही लेखक, कवी आणि लोककलावंत होते. फले-शाहू-आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांचा त्यांनी आपल्या साहित्याद्वारे व्यापक प्रसार केला. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून राज्य शासनाने १ ऑगस्ट हा 'लेखणी प्रेरणा दिन' म्हणून घोषित केल्याची त्यांनी आठवण करून दिली. प्राचार्य डॉ.आनंद भंडारेंनी अण्णाभाऊंच्या 'जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव' या ओळींचा संदर्भ दिला. नगराध्यक्षा सौ.एंड्रलवार, माजी नगराध्यक्ष के.मूर्ती यांनीही अण्णाभाऊंच्या कार्याचा गौरव केला. माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, साजिद खान, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार, उपनगराध्यक्ष हसन लाला, करण एंड्रलवार, मातंग समाजाचे तालुकाध्यक्ष शिवन्ना कलगटवार, विनोद भरणे, स्वागत आयनेनीवार, दादाराव कयापाक, नगरसेवक सुरज सातरवार, प्रशांत कोरडे, संतोष मरासकोल्हे, नगरसेविका ललिता मनेश्वर, सौ.अश्विनी जागर्लावार, सौ.अनुसया अनेलवार, पोलीस निरीक्षक गणेश कराड यांचेसह अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मारोती संकलवाड यांनी केले. सूत्रसंचालन उत्तम कानिंदे यांनी तर आभार लक्ष्मीपती दोनपेल्लीवार यांनी मानले. आयोजन समितीचे अध्यक्ष प्रवीण दोनकलवारसह सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. दरम्यान वृक्षारोपण, रक्तदान, तालुकाभर अभिवादन अशा विविध कार्यक्रमांनी जयंती सोहळा पार पडल्याचे वृत्त आहे.

## जाहीर प्रगटन

मा.४ थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
Civil M.A.No.1065/2026
CNR No.: MHND020021322026

अर्जदार:- १) नफिसा बेगम पि.शेख सलीम वय : ५९ वर्षे, व्यवसाय : घरकाम, रा.घर क्र.९-५-१५८, खुदवाई नगर, चौरस्ता, हबीबिया कॉलनी, इतवारा,नांदेड, २) शेख कलीम पु.शेख सलीम वय : ३५ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय, रा.घर क्र.९-५-९३६, हमीदिया कॉलनी, देगलूर नाका, खिजरा मशिदीजवळ, इतवारा, नांदेड, ३) शेख विकार युनूस पु.शेख सलीम वय : ३२ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय, रा.घर क्र.९-५-२३०८, हमीदिया कॉलनी, खिजरा मशिदीजवळ, देगलूर नाका, इतवारा,नांदेड, ४) शेख जावेद पु.शेख सलीम वय : ३१ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय, रा. घर क्र.९-५-१५८, खुदवाई नगर, चौरस्ता, इतवारा,नांदेड, ५) परवीन सुलताना प.अब्दुल शकील @ परवीन सुलताना पु.शेख सलीम वय : ४२ वर्षे, व्यवसाय : घरकाम, रा.घर क्र.९-५-४९४, पटेल पान शॉप, खुदवाई नगर, चौरस्ता, इतवारा,नांदेड, ६) नाझिया बेगम प.मोहम्मद माजिद @ नाझिया बेगम पु.शेख सलीम वय : २८ वर्षे, व्यवसाय : घरकाम, रा.घर क्र.९-२-३५७, बिलालनगर, अक्सा मशिदीजवळ, देगलूर नाका, इतवारा, नांदेड, ७) गौसिया बेगम प.मोहम्मद बसीत @ गौसिया बेगम पु. शेख सलीम वय : २७ वर्षे, व्यवसाय : घरकाम, रा.घर क्र.९-२-३५७/१, बिलालनगर, हुसेन किराणा शॉप, टायर बोर्ड, इतवारा, नांदेड.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेग्युलेशन कायदा क्र.VIII सन १८२७ मधील कलम २ व ३ अन्वये मयत शेख सलीम पु.शेख छोटे यांच्या कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ या मयत शेख सलीम पि.शेख छोटे यांच्या पत्नी असून अर्जदार क्र.२ ते ४ हे त्यांचे पुत्र तसेच अर्जदार क्र.५ ते ७ या त्यांच्या विवाहित मुली आहेत. मयत शेख सलीम पि.शेख छोटे, रा. घर क्र.९-५-१५८, खुदवाई नगर, चौरस्ता, हबीबिया कॉलनी, इतवारा, ता. व जि.नांदेड येथील कायमस्वरुपी रहिवासी होते. त्याचें दि.०९-०२-२०२५ रोजी त्यांच्या राहत्या घरी निधन झाले आहे.

मयत नामे शेख सलीम पि.शेख छोटे यांना अर्जदार क्र.१ ते ७ यांच्याशिवाय इतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांनी नमूद केले आहे. अर्जदार क्र.१ ते ७ यांनी वारस हक्क प्रमाणपत्र मिळविण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदारांना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही हरकत किंवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत तीस (३०) दिवसांच्या आत अथवा दिनांक ०९/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे, अन्यथा अर्जदारांच्या बाजूने योग्य तो निर्णय देण्यात येईल याची सर्व जबाबदारी संबंधितांवर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दि.०१/०८/२०२६ रोजी माझ्या सही व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क.लिपिक
सह दिवाणी न्यायालय
व.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,
नांदेड

## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १११५/२०२६
तुकाराम व ईतर वि. शाखा व्यवस्थापक
ने. ता. १६/०९/२०२६

अर्जदार:- १. तुकाराम पि.संभाजी कदम, वय : ४५ वर्षे, व्यवसाय : शेती, २. ज्ञानोबा पि.संभाजी कदम, वय: ४४ वर्षे, व्यवसाय : शेती, ३. शंकर पि.संभाजी कदम वय ३६ वर्षे व्यवसाय : शेती, सर्व रा. मरळक (खु.) ता. जि. नांदेड, ४. अंजनाबाई भ्र. तुळशीराम उमरेकर, वय : ५४ वर्षे, व्यवसाय : घरकाम रा. आंबेसांगवी ता. लोहा, जि. नांदेड, ५. राधाबाई भ्र. विश्वंबर बोचरे, वय: ३३ वर्षे, व्यवसाय : घरकाम, रा. पाथरड ता. मुदखेड, जि. नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : मा.शाखा व्यवस्थापक, युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा वाडी (बु.), ता.जि.नांदेड

दावा: भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत यशोदाबाई भ्र. संभाजी कदम यांचा मृत्यु दिनांक ०९/०४/२०२४ रोजी मरळक ता.जि. नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ते ३ सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार ही मयतांची मुले असुन अर्जदार क्र. ४ व ५ हया मयतांच्या मुली आहेत. क्रमांक १ ते ५ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत यशोदाबाई भ्र. संभाजी कदम यांनी त्यांच्या हयातीत गैरअर्जदार यांच्याकडे खाते काढले होते. सदरील खाते क्र. ६५०२०२१२०००१५१४ असुन सदर खात्यामध्ये रक्कम रूपये १८,१८८/- चे बाकी आहेत.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक १६/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणा वर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## जाहीर प्रगटन

श्री के.एस.कुलकर्णी,दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, उमरी
यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ४६/२०२६
विजय व इतर वि. निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : १. विजय रुक्माजी यलसटवार, वय ६८ वर्षे, धंदा वैद्यकीय डॉक्टर, २. नलिनी विजय यलसटवार, वय ६३ वर्षे, व्यवसाय - घरकाम, ३. जयलक्ष्मी विक्रमादित्या यलसटवार, वय ३३ वर्षे, व्यवसाय - घरकाम, ४. राजविर विक्रमादित्या यलसटवार, अ.पा.क. जयलक्ष्मी विक्रमादित्या यलसटवार, वय ०३ वर्षे, व्यवसाय - शिक्षण सर्व रा.उमरी ता.उमरी जि.नांदेड.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

मयत विक्रमादित्य विजय यलसटवार, यांचे दिनांक ०४/०५/२०२६ रोजी त्यांच्या राहत्या घरी, ग्लोबल सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल व्ही. आय. पी. रोड नांदेड, येथे उपचारा दरम्यान निधन झाले.

सदरिल जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार १. विजय रुक्माजी यलसटवार, वय ६८ वर्षे, धंदा - वैद्यकीय डॉक्टर, रा. उमरी ता. उमरी जि. नांदेड. व इतर ३ हे मयताचे वारस असुन त्यांचे व्यतीरिक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत विक्रमादित्य विजय यलसटवार, यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील श्री. बी. जी. सवई, यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरिल प्रमाणपत्र हे सरकारी योजनेसाठी व इतर उदेशासाठी पाहिजे.

हे की, प्रस्तुत प्रकरणात वरिल बाबत कोणास काही अक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्या बाबतचे आपले म्हणने सदरिल जाहिर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक १८/०८/२०२६ पर्यंत विहीत मुदतीच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा अक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहीत धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानीशी दिला.

स्वाक्षरित/-
वरिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर,उमरी जि.नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरी जि.नांदेड

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील मा.२ रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड
यांचे न्यायालय
(समक्ष एम.एस.बोराळे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६०३/२०२६

अर्जदार:- १. बालाजी रावसाहेब मोरे ५९, वय  वर्षे, धंदा मजूरी रा.जोशी सांगवी ता.जि.नांदेड

विरुध्द

०१ सिडको प्रशासक ता.जि.नांदेड

दावा: भारतीय सक्सेशन कायदा १९२५ चे कलम २७८ प्रमाणे प्रशासन प्रमाणपत्र मिळणेबाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, अर्जदार याने वारस पत्र दाखल करण्यासाठी अर्ज केला असून मयत रावसाहेब उमाजी मोरे यांचा मृत्यु दिनांक १७/०१/२००६ रोजी मृत्यू जोशीसांगवी येथे व तसेच त्यांच्या पत्नी यांचा मृत्यू ०४/०७/२०१३ रोजी जोशी सांगवी येथे झाला असून व तसेच अर्जदार त्यांच्या स्वकष्टीत सिडको येथे असलेले घर क्र.ज्याचा Tenment No ND42-/J-3/4605 सिडको, ता.जि.नांदेड १

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे सक्सेशन प्रमाणपत्र देणेसाठी अर्ज दाखल केला आहे. तरी सक्सेशन प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत दिनांक २७/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे. अन्यथा आपणास या प्रकरणात काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन सदरील अर्जाचा कायदेशीर निकाल देण्यात येईल. या प्रकरणात पुढील नेमलेली तारीख २७/०८/२०२६ आहे.

आज दि.०१/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक
सह दि.न्या.,व.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष पी.ए.खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०९०/२०२६
सुंदराबाई व इतर वि.निरंक

अर्जदार:- १. सुंदराबाई भ्र.माणिक खेडकर, वय : ५५ वर्षे धंदाः घरकाम, २. प्रदीप पि.माणिकराव खेडकर, वय : ४६ वर्षे धंदा : मजुरी, ३. ज्योती भ्र.प्रकाश खंदारे, वय : ४६ वर्षे धंदा : घरकाम, रा.वाघमारे किराणा जवळ, नागसेन नगर, नांदेड, ४. अमरदीप पि. माणिकराव खेडकर, वय : ४४ वर्षे धंदा : मजुरी, अर्जदार क्र.१, २ व ४ सर्व रा.नागसेननगर, नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत माणिकराव पि.सटवाजी खेडकर यांचे वारस आहेत. मयत माणिकराव पि.सटवाजी खेडकर यांचा दिनांक ०८/०२/१९८९ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.२ व ४ ही मयताची मुले व अर्जदार क्र.३ ही मयताची मुलगी आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी,प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक १०/०९/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०१/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक
५ वे सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# किनवटमध्ये समाज मंदिराचे बांधकाम निकृष्ट झाल्याचा आरोप

## बांधकाम पाडून नव्याने उभारण्याची मागणी



किनवट/प्रतिनिधी-किनवट नगरपरिषदेच्या हद्दीतील प्रभाग क्र.२ मधील बुद्ध विहार परिसरात सुरू असलेल्या समाज मंदिराचे बांधकाम दर्जेदार होत नसल्याचा आरोप करत या कामाची तातडीने तांत्रिक चौकशी (टेक्निकल ऑडिट) करून दोष आढळल्यास भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी संपूर्ण बांधकाम पाडून नव्याने दर्जेदार बांधकाम करण्यात यावे अशी मागणी नांदेड जिल्हा सेक्युलर मुव्हमेंटचे अध्यक्ष ॲड.एम.यु.सर्पे यांनी केली आहे. नगरपरिषदेच्या बांधकाम विभाग प्रशासनाला मार्च महीन्यात निवेदनाद्वारे कल्पना दिली परंतु त्या निवेदनाची अद्यापही प्रशासनाने दखल घेतलेली नाही हे विशेष.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना (२०२३-२४) अंतर्गत बुद्ध विहार परिसरात सुमारे १ कोटी ४० लाख ६८ हजार ९०० रुपये निधी या समाजमंदिरासाठी देण्यात आलाय. या कामाचा कार्यादेश क्रमांक १०५१/२०२४ हा ५ जून २०२४ रोजी देण्यात आला असून काम पूर्ण करण्यासाठी १८० दिवसांची मुदत निश्चित करण्यात आली मात्र मुदतीत तर काम झाले नाही. दिड वर्षाचा काळ लोटला तरी सदरचे काम अपूर्णच आहे. या कामाचे भूमिपूजन आ.भीमराव केराम यांच्या हस्ते झाले असून, कामाचे कंत्राट व्यंकटराव नरसिंगराव माडपेल्लीवार यांच्याकडे आहे.कामाच्या दर्जा विषयीचे मानक लक्षात घेता आणि प्रत्यक्ष पाहणीत समाजमंदिराचे बांधकाम असावे त्या तुलनेत दर्जेदार नसल्याचे उघड उघड दिसून येत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. इमारतीचा खालचा स्लॅब व संरचना पुरेशी मजबूत नसतानाही त्यावर पहिल्या मजल्याचे बांधकाम सुरू असल्याने भविष्यात दुर्घटना होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सदर काम तातडीने थांबवून तज्ज्ञ समितीकडून तांत्रिक तपासणी करण्यात यावी, दोष सिद्ध झाल्यास संपूर्ण बांधकाम पाडून नव्याने दर्जेदार बांधकाम करणेच एकमेव पर्याय आहे. या प्रकरणी निवेदन देऊन जवळपास सहा महिन्याचा काळ लोटला परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी मुळीच लक्ष दिले नाही. यदाकदाचित दूर्दैवी घटना घडलीसच मग्रुर यंत्रणा दखल घेणार का ? असा संतापजनक सवाल व्यक्त करत ॲड.सर्पे यांनी कारवाईची मागणी केली आहे.

# पंचशील विद्यालयात साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



हदगाव/प्रतिनिधी-शहरातील पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

संस्थेचे सचिव सुनील सोनुले मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. याप्रसंगी पर्यवेक्षक जाधव, बेळकुंदे, संदीप ढोले, परीक्षा प्रमुख ओमकार मुधोळ सह शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी शिक्षक अशोक वाढवे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला उजाळा देत त्यांना अभिवादन केले. शहरात अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीत अनेक समाजबांधव उपस्थित होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सदस्य तथा माजी उपनगराध्यक्ष सुनील हरिहरराव सोनुले यांनी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.


# जल जीवन मिशनच्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन द्या

## औरंगाबाद खंडपीठाचे राज्य सरकारला आदेश

नांदेड/प्रतिनिधी-जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना नियमित वेतन देण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत.३० जुलै रोजी झालेल्या सुनावणीत, सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा करावे तसेच न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत त्यांच्या जागी कोणतीही तदर्थ नियुक्ती करू नये,असे निर्देश न्यायालयाने राज्य शासनाला दिले.

जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन विभागांतर्गत कार्यरत जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनच्या जिल्हा व तालुकास्तरीय कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर २०२५ पासून नियमित वेतन मिळालेले नाही. नियमित वेतन तसेच इतर प्रलंबित मागण्यांसाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने सादर केली होती. तसेच मुंबईतील शिवाजी पार्क येथे आंदोलनही करण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही प्रश्न निकाली न निघाल्याने न्यायालयाचे दार ठोठावण्यात आले.याप्रकरणी जिल्हा परिषद, नांदेड येथील जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन विभागातील डॉ. नंदलाल लोकडे व इतर कर्मचाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली होती.३० जुलै रोजी झालेल्या सुनावणीत याचिकाकर्त्यांच्या वतीने ड. गौतम कर्णे यांनी कर्मचाऱ्यांना अनेक महिन्यांपासून वेतन मिळत नसल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच कर्मचाऱ्यांच्या सेवासुरक्षेबाबतही न्यायालयाकडे मागणी करण्यात आली. शासनाच्या वतीने ड.ए.बी. गिरसे यांनी बाजू मांडली.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी व न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे यांच्या खंडपीठाने, सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा करण्यात यावे तसेच न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत त्यांच्या जागी कोणतीही तदर्थ नियुक्ती करू नये, असे आदेश दिले.या प्रकरणात महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे सचिव, जल जीवन मिशन-स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक तसेच संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गेल्या आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेला वेतनाचा प्रश्न न्यायालयाच्या आदेशानंतर किती लवकर मार्गी लागतो, याकडे राज्यातील जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.










हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४